हे तर जागतिक स्थैर्याचा आधारस्तंभ

भारत – रशिया संबंध ; पंतप्रधान मोदी यांचे प्रतिपादन

तिआनजीन : भारत आणि रशिया हे अगदी कठीण प्रसंगीही "खांद्याला खांदा लावून" उभे राहिले आहेत. भारत-रशिया संबंध हे जागतिक स्थैर्याचा आधारस्तंभ आहेत, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांना सांगितले.

शांघाय सहकार्य संघटनेच्या वार्षिक शिखर परिषदेत मोदी आणि पुतिन यांची भेट झाली. द्विपक्षीय सहकार्य आर्थिक, वित्तीय आणि ऊर्जा क्षेत्रांमध्ये कसे वाढवता येईल, यावर चर्चेचा केंद्रबिंदू होता.

अधिकृत चर्चेपूर्वी दोन्ही नेत्यांनी एससीओ शिखर परिषदेतील कार्यक्रमानंतर एकाच कारमधून प्रवास करताना ४० मिनिटांहून अधिक काळ अनौपचारिक संवाद साधला.

बैठकीतील दूरचित्रवाणीवरील उद्घाटनपर भाषणात मोदी म्हणाले की, युक्रेनमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी सुरू असलेल्या अलीकडील सर्व प्रयत्नांचे भारत स्वागत करतो. मानवतेचे आवाहन आहे की, शत्रुत्व शक्य तितक्या लवकर थांबवण्याचा मार्ग शोधला गेला पाहिजे.

युक्रेनमधील सुरू असलेल्या संघर्षावर आपली सतत चर्चा होत आहे. शांतता प्रस्थापनेसाठी अलीकडील सर्व प्रयत्नांचे आम्ही स्वागत करतो. सर्व पक्षांनी सकारात्मक दृष्टीने पुढे जावे, असा आमचा विश्वास आहे. हा संघर्ष थांबवण्याचा व टिकाऊ शांततेचा मार्ग सापडला पाहिजे. ही संपूर्ण मानवजातीची आकांक्षा आहे, असे मोदी म्हणाले.

भारतीय प्रतिनिधींनी पुतिन यांना शनिवारी झालेल्या मोदी-युक्रेनचे अध्यक्ष वोलोडिमीर झेलेन्स्की यांच्या दूरध्वनी संभाषणाची माहिती दिली, असे समजते.

पुतिन यांनी सांगितले की रशिया आणि भारताने दशकानुदशके "विशेष मैत्रीपूर्ण आणि विश्वासाधारित" संबंध टिकवून ठेवले आहेत आणि हेच भविष्यातील विकासाचे अधिष्ठान आहे. "हे संबंध पक्षीय राजकारणापलीकडचे आहेत आणि दोन्ही देशांच्या बहुसंख्य जनतेचे समर्थन यामागे आहे," असे ते म्हणाले.

भारतीय निवेदनानुसार, मोदींनी युक्रेन संघर्ष सोडवण्यासाठी घेतल्या जात असलेल्या अलीकडील पुढाकारांना पाठिंबा दर्शवला. संघर्षाचा अंत लवकर व्हावा आणि "कायमस्वरुपी शांततेचा" तोडगा निघावा, यावर त्यांनी भर दिला.

अमेरिकेने भारतावरील टॅरिफ दुप्पट करून ५० टक्क्यांवर नेल्यामुळे, तसेच रशियन खनिज तेल खरेदीवर २५ टक्के अधिभार लावल्यानंतर, भारत-अमेरिकेचे संबंध तणावपूर्ण झाले आहेत. अनौपचारिक चर्चेत मोदी-पुतिन यांनी याबाबतही चर्चा केल्याचे मानले जाते.

मोदी म्हणाले, " भारतीय डिसेंबरमध्ये रशियाच्या राष्ट्राध्यक्षांचे भारतात स्वागत करण्यास उत्सुक आहेत. हे आपल्या विशेष व सवलतीच्या सामरिक भागीदारीची व्याप्ती दाखवते. भारत आणि रशिया नेहमीच कठीण प्रसंगी एकत्र उभे राहिले आहेत. आपले घनिष्ठ सहकार्य हे दोन्ही देशांच्या जनतेसाठीच नव्हे, तर जागतिक शांतता, स्थैर्य आणि समृद्धीसाठी महत्त्वाचे आहे," असे मोदी म्हणाले.

भारतीय निवेदनानुसार, मोदी-पुतिन यांनी आर्थिक, वित्तीय आणि ऊर्जा क्षेत्रांतील सहकार्याची समीक्षा केली व या क्षेत्रांतील सतत वाढणाऱ्या द्विपक्षीय संबंधांबद्दल समाधान व्यक्त केले.

"दोन्ही नेत्यांनी भारत-रशिया विशेष व सवलतीच्या सामरिक भागीदारीला अधिक मजबूत करण्यास समर्थन दर्शवले," असे निवेदनात म्हटले आहे.

मोदी-पुतीन यांची 'लिमोझीन'मध्ये चर्चा

तियानजिन : पंतप्रधान नरेंद्र मोदींना रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी त्यांच्या लिमोझिनमध्ये बसून शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशन (एससीओ) शिखर परिषदेच्या निमित्ताने येथे झालेल्या द्विपक्षीय चर्चेच्या स्थळी पोहोचवले. दोघांमध्ये जवळपास ५० मिनीटे चर्चा झाली.

इथेनॉलमुक्त पेट्रोलची मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली

नवी दिल्ली : पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळण्यास विरोध करणारी याचिका सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. देशवासीयांना इथेनॉलमुक्त पेट्रोलचा पर्यायही मिळाला पाहिजे, असे याचिकेत म्हटले होते.

सरन्यायाधीश भूषण गवई आणि के. विनोद चंद्रन यांच्यासमोर संपूर्ण प्रकरणाची सुनावणी झाली. सरकारच्या वतीने अॅटर्नी जनरल आर. वेंकटरमणी यांची बाजू ऐकल्यानंतर न्यायालयाने याचिका फेटाळून लावली. त्यामुळे देशवासीयांना इथेनॉलमुक्त पेट्रोलचा पर्याय मिळणार नाही.

सुनावणीदरम्यान, वरिष्ठ वकील सदन फरासत यांनी याचिकाकर्त्याची बाजू मांडली. नीती आयोगाच्या २०२१ च्या अहवालाचा हवाला देत त्यांनी सांगितले की, २० टक्के इथेनॉलयुक्त पेट्रोल २०२३ पूर्वी देशात उत्पादित झालेल्या वाहनांसाठी योग्य नाही. यामुळे वाहनांचे मायलेज सहा टक्क्यांपर्यंत कमी होते. वकिलाने असेही म्हटले की, याचिकाकर्ता इथेनॉलयुक्त पेट्रोलच्या विरोधात नाही.

सरकारची भूमिका

भारताचे अॅटर्नी जनरल आर. वेंकटरमणी म्हणाले की, याचिकाकर्ता फक्त एक नाव आहे. त्यांच्या मागे एक मोठी लॉबी काम करत आहे. सरकारने सर्व बाबी लक्षात घेऊन हे धोरण बनवले आहे. याचा फायदा ऊस व्यापाऱ्यांना होतोय. देशाबाहेर बसलेले लोक देशात कोणत्या प्रकारचे पेट्रोल उपलब्ध असेल, हे ठरवू शकत नाहीत. या युक्तीवादानंतर सरन्यायाधीशांनी याचिका फेटाळून लावली.

बिहारमध्ये ९९.५ टक्के मतदारांनी पात्रतेची कागदपत्रे केली दाखल

नवी दिल्ली: निवडणुकीच्या उंबरठ्यावर असलेल्या बिहारमध्ये विशेष सखोल मतदार यादी पुर्ननिरीक्षण मोहिमेसाठी अंदाजे ७.२४ कोटीपैकी सुमारे ९९.५ टक्के मतदारांनी पात्रतेची कागदपत्रे सादर केली आहेत, अशी माहिती निवडणूक आयोगाने सोमवारी सुप्रीम कोर्टाला कळवले आहे. राजद आणि सीपीआय (एम) वगळता अन्य कोणत्याही राजकीय पक्षाने निर्धारित स्वरूपात दावे व हरकती दाखल करण्यास मतदारांना मदत केलेली नाही.

सुप्रीम कोर्टाचे न्या. सुर्य कांत आणि जयमाला बागची यांच्या खंडपीठाला आयोगाने सांगितले की, मतदारांनी अधिक "सावधानता व सक्रियता" दाखवली असून त्यांनी मसुदा यादीत नावांचा समावेश करण्यासाठी ३३,३२६ फॉर्म, नाव वगळण्यासाठी २,०७,५६५ फॉर्म भरले आहेत, तर प्रथमच मतदार बनणाऱ्यांकडून १५ लाखांहून अधिक अर्ज आले आहेत.

बिहारमधील अंदाजे ७.२४ कोटीपैकी ९९.५ टक्के मतदारांनी 'एसआयआर' मोहिमेसंदर्भातील पात्रतेची कागदपत्रे सादर केली आहेत," असे आयोगाच्या वतीने वरिष्ठ वकील राकेश द्विवेदी यांनी सांगितले.

पूरग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी मोदी सरकार कटिबद्ध

जम्मू: जम्मू-काश्मीरमध्ये अलीकडील पुरामुळे नुकसान झालेल्या जनतेच्या पुनर्वसनासाठी नरेंद्र मोदी सरकार कटिबद्ध असल्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सोमवारी सांगितले. शाह यांनी येथील पुरग्रस्त भागांचा दौरा केला.

गृहमंत्र्यांनी जम्मू विमानतळाजवळील मंगुचक गावाला भेट दिली. त्यांच्यासोबत राज्यपाल मनोज सिन्हा, मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला, विरोधी पक्षनेते सुनील शर्मा तसेच भाजपचे जम्मू-काश्मीर प्रदेशाध्यक्ष सत शर्मा आणि इतर वरिष्ठ नेते उपस्थित होते.

शाह रविवारी रात्री जम्मूत पोहोचले होते. त्यांनी राजभवनात भेटीगाठी घेतल्यानंतर मंगुचक या सर्वाधिक प्रभावित गावात जाऊन प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेतला.

गावकऱ्यांशी संवाद साधताना शाह यांनी योग्य ती मदत व पुनर्वसनाची खात्री दिली. त्यांनी 'एक्स' या प्लॅटफॉर्मवर लिहिले की, "आज मी जम्मूमधील मंगुचक गावाला भेट दिली. येथे मदत व बचावकार्य सुरू असून आपत्ती निवारण पथके वैद्यकीय सेवांसह मदत पोहोचवत आहेत. प्रभावितांच्या पुनर्वसनासाठी मोदी सरकार सर्व उपाययोजना करेल."

यापूर्वी शाह यांनी बिक्रम चौकाजवळील तावी पुलावर थांबून नदीकाठावरील नुकसानीची पाहणी केली. जम्मूचे विभागीय आयुक्त रमेश कुमार आणि इतर अधिकाऱ्यांनी त्यांना माहिती दिली.

मी आयुष्यात असा पूर पाहिलेला नाही. फ्रीज, एअरकंडिशनर, कपडे सर्व वाहून गेले. पुरामुळे माझ्या घरात आता वस्तूच राहिल्या नाहीत, असे मंगुचकचे रहिवासी भानसिंह यांनी गृहमंत्री शाह यांना सांगितले.

यात नायब राज्यपाल सिन्हा, मुख्यमंत्री अब्दुल्ला, शर्मा, पोलीस महासंचालक नलिन प्रभात आणि केंद्र तसेच केंद्रशासित प्रदेश प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते.

शाह यांचा गेल्या तीन महिन्यांतील जम्मू दौरा हा दुसरा आहे. यापूर्वी २९ मे रोजी ते पहीलगाव दहशतवादी हल्ल्याच्या प्रत्युत्तरात भारतीय लष्कराने सीमेपार कारवाई केल्यानंतर जम्मूत आले होते.

शाखा कार्यालय – नेरळ
सेंट्रल बँक ऑफ इंडिया, श्रीनाथ कॉटेज बिल्डिंग, नेरळ माथेरान रोड, नेरळ गांव, कर्जत तालुका, रायगड, महाराष्ट्र – ४१०१०१. दूर.: ०२२-२२६१२००८

कब्जा सूचना

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार **सेंट्रल बँक ऑफ इंडिया**चे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ (५४ ऑफ २००२) आणि कलम १३ (१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दिनांक **११/११/२०२४** रोजीस **मागणी सूचना** जारी करून कलम १३ (२) कर्जदार **अजज अख्तर शेख** यांस सूचनेतील एकूण नमूद रक्कम **रु. १५०६४६३.६१/– (रुपये पंधरा लाख सहा हजार चारशे त्रेसष्ट आणि पैसे एकसष्ट मात्र) अधिक त्यावरील व्याज या रकमेची परतफेड सदर सूचना प्रसिद्धीच्या तारखेपासून ६० दिवसांत करण्यात सांगितले होते.**

रकमेची परतफेड करण्यास कर्जदार असमर्थ ठरल्याने, कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खाली वर्णन करण्यात आलेल्या मिळकतीचा **प्रत्यक्ष कब्जा** त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून सदर अॅक्टच्या कलम १३(४) च्या सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ अन्वये या **२९ ऑगस्ट २०२५** रोजी घेतला आहे.

विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतीशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी करण्यात आलेला कोणताही व्यवहार हा सेंट्रल बँक ऑफ इंडिया, यांस रक्कम रु. **१५०६४६३.६१/– (रुपये पंधरा लाख सहा हजार चारशे त्रेसष्ट आणि पैसे एकसष्ट मात्र)** आणि त्यावरील व्याजाच्या भाराअधीन राहील.

तारण मत्तांच्या विमोचनाकरिता उपलब्ध वेळेच्या संदर्भात सदर अॅक्टचे कलम (१३) चे उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधून घेतले जाते.

मिळकतीचे वर्णन

मिळकतीचे ते सर्व भाग आणि विभाग तपशील पत्ता: : फ्लॅट क्र. ५०४, ५ वा मजला, नाझ प्लाझा, मु. – ममदापूर, मु. पोस्ट–नेरल, तालुका–कर्जत, जिल्हा–रायगड, महाराष्ट्र–४१०१०१. मोजमापित क्षेत्र: २७६ चौ. फूट.

(लता गणेश)
स्थळ : नेरळ — अधिकृत अधिकारी
दिनांक : २९/८/२०२५ — सेंट्रल बँक ऑफ इंडिया

जाहीर सूचना

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. कपिल श्रीचंद खिचड आणि श्रीमती प्रियांका कपिल खिचड यांना फ्लॅट क्रमांक ४०५, क्षेत्रफळ अंदाजे २२५ चौ. फूट (कार्पेट एरिया), चौथ्या मजल्यावर, इमारत क्रमांक ७ए, शांतिनिकेतन एस.आर.ए., एल. आर. पापन मार्ग, गांधी नगर, वरळी, मुंबई – ४०० ०१८ येथील संबंधित समभागांसह, शांतिनिकेतन एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. मधील त्यांचा सदर फ्लॅट विकण्याचा मानस आहे. माझ्या अशिलांच्या मते, १३ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या नोंदणीकृत विक्रीखत आणि सदर फ्लॅटसाठीचा मूळ समभाग प्रमाणपत्र वगळता, सदर फ्लॅटसंबंधीचे सर्व आधीचे हक्कदावे, कागदपत्रे, दस्तऐवज व पत्रके हरवलेली किंवा गहाळ झालेली आहेत. त्याबाबत मुंबई येथील वरळी पोलिस ठाण्यात दिनांक ०१/०९/२०२५ रोजी हरवलेबाबतची तक्रार दाखल करण्यात आली असून, तिचा तक्रार क्रमांक आहे ११४००९-२०२५.

जर कोणास ही कागदपत्रे सापडल्यास, कृपया खालील पत्त्यावर ती सुपूर्त करावीत. तसेच, कोणताही व्यक्ती/संस्था/संघटना या वरील नमूद फ्लॅट किंवा त्याच्याशी संबंधित संस्थेच्या समभागांवर कोणताही हक्क, दावा, हरकत ठेवत असेल, त्यांनी ही बाब लेखी स्वरूपात, आवश्यक पुराव्यासह, खाली नमूद केलेल्या पत्त्यावर, या जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत आमच्याकडे सुपूर्त करावी. नोंदणी ए/डी पोस्ट किंवा समजूतदार पोचपावतीद्वारे ही माहिती दिली जावी. यानंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही दावे अथवा हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, आणि त्या सर्वार्थाने अडकवलेल्या किंवा नाकारलेल्या असे गृहीत धरले जाईल.

दिनांक ०२ सप्टेंबर, २०२५
ठिकाण – मुंबई

सही/–
(श्रेणिक बलिया)
वकील
कार्यालय क्र. १०२, पहिला मजला, पोडियम, वीरमहल, भारत माता जंक्शन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, लालबाग, मुंबई ४०० ०१२.

जाहीर सूचना

माझे अशिल श्री. राजेश लधाराम भानुशाली हे फ्लॅट क्र. ४०/बी, दुसरा मजला, सिंधू वाडी, द फेअर लाईफ को-ऑप. हौ. सो. लि., २९, सिंधू वाडी, एम. जी. रोड, घाटकोपर (पूर्व), मुंबई – ४०००७७ या इमारतीमधील सदर फ्लॅटचे एकमेव व पूर्ण मालक आहेत. श्री. किरीट जेठालाल दोशी हे पूर्वी या सदर फ्लॅटचे मालक होते आणि दिनांक १५/०३/२०२४ रोजी त्यांच्या निधनानंतर त्यांचा अधिकार, हक्क व स्वारस्य त्यांचे कायदेशीर वारसदार म्हणजे श्रीमती ज्योती किरीट दोशी, श्री. कुंज किरीट दोशी आणि श्री. कौशल किरीट दोशी यांच्यावर आला. नोंदणीकृत विमोचन दस्तऐवज दिनांक ०५/१०/२०२४ नुसार, वरील कुंज किरीट दोशी व कौशल किरीट दोशी यांनी त्यांच्या अनुक्रमे १/३ अपारस्परिक हिस्सा श्रीमती ज्योती किरीट दोशी यांच्या नावे हस्तांतरित केला. त्यानंतर, नोंदणीकृत विक्री करार दिनांक १८/१०/२०२४ नुसार, श्रीमती ज्योती किरीट दोशी यांनी वरील फ्लॅट आमचे अशिल श्री. राजेश लधाराम भानुशाली यांना विकण्यास मान्यता दिली आहे. आमचे अशिल दिनांक ०५/१०/२०२४ च्या वरील विमोचन दस्तऐवजाच्या मूळ प्रतिच्या ताब्यात नाहीत, कारण ती हरवलेली आहे किंवा गहाळ असून सापडत नाही.

सदर फ्लॅट किंवा त्यातील कोणत्याही भागावर कोणालाही विक्री, भेट, भाडेपट्टी, वारसा, विनिमय, गहाणखत, तारण, दावा, हक्क, ट्रस्ट, ताबा, हक्कमार्ग, जप्ती इत्यादी कोणत्याही प्रकारे स्वारस्य असल्यास, त्यांनी ही माहिती खाली नमूद केलेल्या पत्त्यावर अधोहस्ताक्षरी वकिलांना लेखी स्वरूपात या जाहीर सूचनेच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत पुराव्यासह कळवावी, अन्यथा कोणताही दावा अस्तित्वात नसल्याचे गृहित धरले जाईल व तो दावा (असल्यास) त्यागलेला/अस्वीकृत मानला जाईल.

संतोष आर. शेट्टी अॅण्ड असोसिएटस्
वकील
७०५/ए, बोनांझा, सहार प्लाझा
जे.बी. नगर, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०००५९
ईमेल: srshettyassociates@gmail.com

जाहीर सूचना

सर्वसामान्य जनतेच्या निदर्शनास आणून देण्यात येते की श्रीमती मिना कालिया व श्री. विनीत कालिया हे ब्रिंदाबन बिल्डिंग क्र.२ हाउसिंग सोसायटी लिमिटेड, पूनम नगर, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०००९३ येथील फ्लॅट क्र. ९०१/२९ चे संयुक्त मालक आहेत. दिनांक २५.०३.२०२५ रोजी श्रीमती मिना कालिया यांचे निधन वारसा हक्काचा कोणताही दस्तऐवज किंवा नामनिर्देशन न करता झाले असून, त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे पती श्री. विनीत कालिया यांनी सदर फ्लॅट व शेअर्स त्यांच्या नावावर हस्तांतरित करून घेण्याबाबत सोसायटीकडे अर्ज केला आहे.

ब्रिंदाबन बिल्डिंग क्र.२ हाउसिंग सोसायटी लिमिटेड व त्याचे पदाधिकारी सर्व संबंधित वारसदार, हितधारक किंवा तृतीय पक्ष यांना विनंती करीत आहेत की, मृत सदस्याच्या सोसायटीतील भांडवलातील/मालमत्तेतील हक्काच्या हस्तांतरणासंदर्भात कोणा व्यक्तीस कोणताही दावा/हरकत/हक्क असल्यास त्यांनी त्यांचे म्हणणे व त्यासंबंधित पुरावा लेखी स्वरूपात खाली नमूद केलेल्या पत्त्यावर १५ (पंधरा) दिवसांच्या आत सादर करावा.

जर सदर दावे/हरकतीस कोणताही कागदोपत्री पुरावा सादर करण्यात आलेला नाही, तर असे दावे अमान्य समजले जातील आणि सोसायटीकडून कोणताही संदर्भ न घेता व्यवहार पूर्ण केला जाईल. अशा कोणत्याही व्यक्तींचा दावा असल्यास, तो त्याग केलेला/नाकारलेला समजून, आमच्या ग्राहकावर बंधनकारक मानला जाणार नाही.

आपला विश्वासू,
(स्वाक्षरी)
श्री. संतोष डी. झिंबरे
उच्च न्यायालयाचे वकील
१०/ए, ३०१, कोकण अरेश्वर सीएचएस. लि.,
कोकण नगर, जोगेश्वरी (पूर्व),
मुंबई – ४०००६०
मो.क्र.: ८३६९३३६०२६
दिनांक – ०२.०९.२०२५

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India
भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking
खारघर शाखा :
शॉप क्र. १, २ आणि ३, खारघर सेक्टर-४, रायगड ४१०२१०

जोडपत्र IV कब्जा सूचना (नियम ८(१)) (स्थावर मिळकतीकरिता)

ज्याअर्थी : निम्नस्वाक्षरीकर्ता, **युनियन बँक ऑफ इंडिया, खारघर शाखा सेक्टर – ४** शाखाचे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अन्वये आणि कलम १३ (१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून **दिनांक ०६/१०/२०२१ रोजी एक मागणी सूचना** जारी करून **अर्जदार श्री. रामदास एम कांबळे आणि सौ. रेखा रामदास कांबळे** यांना सदर सूचनेमध्ये नमुद रक्कम **रु. ११,९३,०२१.५९/– (रुपये अकरा लाख त्र्याण्णव हजार एकवीस आणि पैसे एकोणसाठ मात्र)** आणि त्यावरील व्याजाची परतफेड सदर सूचना प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांत करण्यास सांगितले होते.

सदर रकमेची परतफेड करण्यात कर्जदार असमर्थ ठरल्याने, याद्वारे कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खाली वर्णन केलेल्या मिळकतीचा **कब्जा** त्याला/तिला सदर अॅक्टच्या कलम १३(४) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून **२५ ऑगस्ट, २०२५** रोजीस घेतला आहे.

विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, उक्त मिळकतीशी व्यवहार करू नये व सदर मिळकतीशी कोणताही व्यवहार हा **युनियन बँक ऑफ इंडिया, खारघर शाखा (एसओआय आयडी १५३०१)** च्या रक्कम **रु. ११,९३,०२१.५९/– (रुपये अकरा लाख त्र्याण्णव हजार एकवीस आणि पैसे एकोणसाठ मात्र)** २९.०८.२०२१ **रोजीस** आणि त्यावरील व्याजाच्या भाराअधीन राहील.

तारण मत्ता विमोचनासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ च्या पोट-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

तारण मत्तेचे वर्णन:
रहिवासीत फ्लॅट क्र. ००१, तळमजला, सी१, नंददीप रेसिडन्सी, वारेडी कर्जत, जि. रायगड, महाराष्ट्र ४१०२०१.
युनियन बँक ऑफ इंडिया करीता

सही/–
दिनांक : २५/०८/२०२५ — (धनंजय एन इंगळे)
ठिकाण : कर्जत — मुख्य व्यवस्थापक आणि प्राधिकृत अधिकारी,

परिशिष्ट IV-A
(स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना)

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम 2002 चा नियम 8(6) आणि नियम 9(1)च्या नियमांना सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 अन्वये स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई–लिलावाची विक्री सूचना.

सर्वसामान्य जनतेला आणि विशेषत: कर्जदारांना तसेच हमीदारांना सूचीत करण्यात येते की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित कर्जदात्यांनी गहाण केली गेली होती त्या मालमत्तेवर सुरक्षित कर्जदात्याच्या प्राधिकृत अधिकारीने **सम्मान कॅपिटल लिमिटेड (पूर्वी इंडियाबुल्स हाऊसिंग फायनान्स लि. म्हणून ओळखले जायचे) [CIN : L65922DL2005PLC136029]** (''सुरक्षित कर्जदार'') तर्फे **वास्तविक ताबा** घेतला आहे. ज्याचा **19.09.2025** रोजी **संध्याकाळी 05.00 ते 06.00** पर्यंत ''**जेथे आहे**'', ''**जसे आहे**'' **आणि** ''**जे काहीपण आहे**'', ची वसूली साठी **कर्ज खाते नं. HHLBAD00300184** साठी **रु. 28,47,182/- (रुपये अठ्ठावीस लाख सत्तेचाळीस हजार एकशे ब्याऐंशी फक्त)** उर्वरित मूलधन, उर्वरित (विलंबशुल्क) आणि दिनांक **21.08.2025** पर्यंत व्याज कर्जाच्या अटींनुसार कर्ज करार आणि इतर संबंधित कर्ज दस्तऐवजांच्या संदर्भात लागू भविष्यातील व्याज **22.08.2025** पासून कायदेशीर खर्च किंवा इतर शुल्का सह प्रभावी होऊन जो **बाळकृष्ण हरी राऊत, जयश्री हरी राऊत आणि दत्ताराम मुकुंद कोणकर (हमीदार)** यांची मालमत्ता सुरक्षित कर्जदाराच्या द्वारे कर्जाच्या वसूली साठी विकली जाईल.

सदर मालमत्तेच्या लिलावासाठी आरक्षित रक्कम **रु. 13,00,000/- (रुपये तेरा लाख फक्त)** आणि अर्नेस्ट मनी डिपॉजिट (''**ईएमडी**'') **रु. 1,30,000/- (रुपये एक लाख तीस हजार फक्त)** म्हणजेच अनामत ठेव रक्कम राखीव किंमतीच्या 10% असेल.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

फ्लॅट क्र. 101, 464 चौरस फूट मोजमापाचे कार्पेट क्षेत्र, ''कोरल'' बिल्डिंगमधील पहिल्या मजल्यावर, (जी–विंग), ''ज्वेल अरिस्टा'' नामक प्रकल्पामध्ये, सोनिवली गावात स्थित, तालुका अंबरनाथ, बदलापूर पश्चिम, ठाणे – 421503, महाराष्ट्र.

विक्रीच्या तपशीलवार नियम व अटींसाठी कृपया सुरक्षित कर्जदाराच्या www.sammaancapital.com या वेबसाईटवरील लिंक पाहा; संपर्क क्र. : 0124-6910910, +91 7065451024, ई–मेल : auctionhelpline@sammaancapital.com. बोली लावण्यासाठी, www.auctionfocus.in वर लॉग ऑन करा.

सही/–
अधिकृत अधिकारी
तारीख : 25.08.2025 — सम्मान कॅपिटल लिमिटेड
स्थळ : ठाणे — (पूर्वी इंडियाबुल्स हाऊसिंग फायनान्स लि. म्हणून ओळखले जायचे)

प्रपत्र क्र. ३
[नियम–१३(१)(ए)पहा]

कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी १)
२रा मजला, कुलाबा, टेलिफोन भवन, कुलाबा मार्केट, मुंबई – ४०० ००५.
(५वा मजला, सिंधिया हाऊस, बॅलार्ड पिअर, मुंबई–४००००१)

खटला क्र.: टीए/५१९/२०२३ परि. क्र. २२

कर्ज वसूली न्यायाधिकरण (कार्यवाही) रुल्स, १९९३ च्या नियम ५ च्या उप–नियम (२ए) सहवाचता अॅक्टच्या कलम १९ च्या उप–कलम (४) अंतर्गत समन्स.

आयडीबीआय बँक लिमिटेड
विरुद्ध
मे. क्रिस्टल कलेक्शन

(१) मे. क्रिस्टल कलेक्शन
दुकान क्र. ५७–ए, १ला मजला, नक्षत्र सिने शॉपी, रानडे रोड, दादर पश्चिम, मुंबई, महाराष्ट्र –४००२८.
(२) श्री प्रकाश मिश्रीलाल कनोजिया
५०४, ५ वा मजला, दीप रेसिडेंन्सी, जेरबाई वाडिया रोड, परेल भोईवाड, मुंबई, महाराष्ट्र–४०००१२.
(३) श्रीमती आशा प्रकाश मिश्रीलाल कनोजिया
५०४, ५ वा मजला, दीप रेसिडेंन्सी, जेरबाई वाडिया रोड, परेल, भोईवाड, मुंबई, महाराष्ट्र–४०००१२.

समन्स

ज्याअर्थी, वरील नमूद **टीए/५१९/२०२३** नामदार प्रबंधक/पीठासिन अधिकाऱ्यांसमोर **२४/०४/२०२५** रोजी सूचीबद्ध केला होता.

ज्याअर्थी, नामदार न्यायाधिकरणाने कृपावंत होऊन **रु. १५१८४६१२/–** च्या कर्जाच्या वसुलीसाठी तुमच्याविरुद्ध दाखल केलेल्या अॅक्टच्या कलम १९(४) अंतर्गत सदर अर्जावर (ओए) समन्स/सूचना जारी केली. (जोडलेल्या दस्तावेजांच्या प्रतींसह अर्ज).

अॅक्टच्या कलम १९ च्या पोट–कलम (४) नुसार, तुम्हा प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत:–
(i) विनंती केलेल्या अनुतोषांना मंजुरी का देऊ नये त्याची समन्सच्या बजावणीच्या तीस दिवसांत कारणे दाखविण्यासाठी;
(ii) मूळ अर्जाच्या अनु. क्र. ३ए अंतर्गत अर्जदारांनी विनिर्दिष्ट केलेल्या मिळकती आणि मत्तांव्यतिरिक्त अन्य मिळकती आणि मत्तांचे तपशील जाहीर करणे;
(iii) मिळकतींच्या जप्तीसाठीच्या अर्जावरील सुनावणी आणि निकाल प्रलंबित असल्याने मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ए अंतर्गत जाहीर केलेल्या अशा अन्य मत्ता आणि मिळकतींचा आणि तारण मत्तांचा व्यवहार करण्यास किंवा त्या निकाली काढण्यास तुम्हाला मज्जाव करण्यात आला आहे.
(iv) तुम्ही न्यायाधिकरणाची पूर्व परवानगी घेतल्याखेरीज ज्यावर तारण हितसंबंध बनवले आहेत त्या कोणत्याही मत्तांची आणि/किंवा मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ ए अंतर्गत जाहीर किंवा विनिर्दिष्ट केलेल्या अन्य मत्ता आणि मिळकतींचे त्यांच्या व्यवसायाच्या सामान्य कामकाजाव्यतिरिक्त विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करणार नाहीत.
(v) व्यवसायाच्या नियमित कामकाजाच्या ओघांत तारण मत्ता किंवा अन्य मत्ता व मिळकती यांच्या विक्रीतून रोकड झालेल्या विक्री रकमेचा हिशोब देण्यास तुम्ही बांधील असाल व अशी विक्री रक्कम अशा मत्तांवर तारण हितसंबंध धारण करणाऱ्या बँक किंवा वित्तीय संस्थेकडे ठेवलेल्या खात्यामध्ये जमा केली पाहिजे.

तुम्हाला **०३.११.२०२५ रोजी दु. १२.१५ वा.** लेखी निवेदन सादर करून त्याची एक प्रत अर्जदारांना सादर करण्याचे व **रजिस्ट्रारसमोर** हजर राहण्याचे देखील निर्देश देण्यात येत आहेत, कसूर केल्यास, तुमच्या गैरहजेरीत अर्जावर सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

माझ्या हस्ते आणि ह्या न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ह्या दिनांक: १९.०५.२०२५ रोजी दिले.

समन्स जारी करण्याकरीता प्राधिकृत अधिकारांची स्वाक्षरी
शिक्